# महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ
## विभागीय कार्यालय, पुणे

**( स्वायत्त )( ISO 9001:2015 )( ISO/IEC – 27001:2013)**
**४१२/ब, मंडळाची इमारत, चौथा मजला, बहिरट पाटील चौक,**
**मॉडेल कॉलनी, शिवाजी नगर, पुणे - ४११०१६**
Email :rbtepn@msbte.com दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६९९४ Web. www.msbte.org.in


जा.क्र. मरातंशिमं/विकापु/हि.प. २०२५/पी–१ व पी–२/१३३४ दिनांक :– १३/१०/२०२४

प्रति,
प्राचार्य,
**0711 - Jayawant shikshan prasarak mandal's jaywantrao sawant polytechnic , hadapsar**

**विषय** –महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाची हिवाळी परीक्षा २०२५ लेखी परीक्षेबाबत.

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, मा. सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांनी आपली संस्था उपरोक्त परीक्षेसाठी परीक्षा केंद्र म्हणून घोषित केली असून मुख्य परीक्षा केंद्राधिकारी म्हणून आपली नेमणूक करण्यात येत आहे. मुख्य परीक्षा केंद्राधिकारी म्हणून आपण **Manual for Conduct of Examination (wef. A.Y. 2018-19) and MSBTE's Examination Regulation Book (wef. A.Y. 2018-19)मधील परीक्षा संदर्भात महत्वाच्या सुचनांचे अवलोकन करुन परीक्षा घेण्यात याव्यात** अणि आवश्यक ती कार्यवाही करावी. सदर पुस्तकातील सुचनांचे काटेकोरपणे पालन करून परीक्षा सुरळीत पार पाडाव्यात व सदर सूचना संबंधित अधिकारी व कर्मचारी वर्ग यांच्याही निदर्शनास आणाव्यात. सदरच्या Manual ची प्रत MSBTE च्या वेब साईटवर उपलबध करुन देण्यात आली आहे. आपल्या परीक्षा केंद्राशी संलग्नीत संस्थांची यादी सोबत जोडण्यात येत आहे.

**Manual for Conduct of Examination (wef. A.Y. 2018-19) and MSBTE's Examination Regulation Book (wef. A.Y. 2018-19)** नुसार परीक्षेसंबंधी आवश्यक अधिकारी व कर्मचारी यांची नेमणुक करण्यात यावी. संबंधितांना जा. क्र. मरातंशिमं/का–१०/मानधन/२०२४/४१ दिनांक ०४/०६/२०२४ नुसार मानधन देय राहील. परीक्षेसंबंधित बिले apbilling.msbte.edu.in/rbte_pune या ऑनलाईन बिलींग पोर्टलवर भरणे आवश्यक आहे. परीक्षेच्या कालावधीत परीक्षाकेंद्रावर कायदा व सुव्यवस्थेकरीता पोलीस बंदोबस्त असणे आवश्यक आहे. तसेच प्रश्नपत्रिका उत्तरपत्रिका यांच्या सुरक्षितेबाबत काळजी घेण्यात यावी.

परीक्षेच्या कालावधीमध्ये परीक्षाकेंद्रामध्ये परीक्षेच्या कामात **शिस्त व सुसूत्रतेसाठी** आवश्यकता भासल्यास परीक्षा केंद्राशी संलग्नीत संस्थांच्या प्रतिनिधींना बोलवण्यात यावे.

परीक्षेसंदर्भात काही महत्वाच्या सुचना :–

- **हिवाळी परीक्षा २०२५ पासून मंडळाकडून ऑनलाईन पध्दतीने परीक्षा केंद्रास प्रश्नपत्रिका उपलब्ध होणार आहेत. त्याअनुषंगाने परीक्षा काळामध्ये प्राचार्य हे स्वतः मुख्य परीक्षाकेंद्र अधिकारी म्हणून काम बघतील**
- **प्राचार्य/मुख्य परीक्षा केंद्राधिकारी यांनी परीक्षेच्या काळात प्रश्नपत्रिका डाऊनलोड करतेवेळी उपस्थित राहणे अनिवार्य आहे. तसेच परीक्षेच्या काळात प्राचार्य/मुख्य परीक्षा केंद्राधिकारी यांना परीक्षा केंद्र सोडावयाचे असल्यास त्यांनी पर्यायी व्यवस्था करुन वरिष्ठ कार्यालयाची परवानगी घेवूनच परीक्षाकेंद्र सोडावे.**
- कोणताही विदयार्थी परीक्षेपासून वंचित राहू नये म्हणून आपल्या केंद्रात बसणा–या सर्व परिक्षार्थीना परीक्षा वेळापत्रकाबाबतची माहिती कळवून वेळापत्रकाची एक प्रत सुचना फलकावर लावण्यात यावी.
- परिक्षार्थीची बैठक व्यवस्था मंडळाच्या नियमाप्रमाणे करण्यात याव्यात.
- विदयार्थ्यांना परीक्षा केंद्रामध्ये परीक्षेसाठी आवश्यक असलेले साहित्य सोडून पुस्तके, दप्तर, मोबाईल व इतर कोणतेही साहित्य सोबत घेऊन जाण्यास प्रतिबंध करण्यात यावा. तसेच परीक्षाकेंद्रातील सर्व परीक्षेच्या खोल्या, प्रसाधनगृहे, भिंती व इतर सर्व आजुबाजूचा परिसर दररोज स्वच्छ करणे आवश्यक आहे.
- प्रत्येक परिक्षार्थीकडे ओळखपत्र आणि हॉल तिकीट असणे बंधनकारक आहे. **हॉल तिकीटवर प्राचार्य/विभागप्रमुख यांची स्वाक्षरी असणे अत्यावश्यक आहे.(स्टॅम्प स्वाक्षरी चालणार नाही) तसेच मंडळाने परिक्षार्थीकरीता निर्देशिलेल्या सुचना लेखी स्वरुपात A3 Size** पेपरवर **संस्थेच्या नोटीस बोर्डवर लावून परिक्षार्थींच्या निदर्शनास आणणे आवश्यक आहे.**
- परीक्षा केंद्रांवर परीक्षेला बसणा–या द्विव्यांग विदयार्थ्यांच्या उत्तरपत्रिका/पुरवणी उत्तरपत्रिकेवर**Right Hand Top Corner** वर **PWD** असा शिक्का मारावा असे ऑफिसर इनचार्ज (परीक्षाकेंद्र) यांना सुचित करण्यात येत असून याची अंमलबजावणी परीक्षाकेंद्रा कडून होईल याबाबत आवश्यक ती दक्षता घ्यावी. द्विव्यांग विदयार्थ्यांची परीक्षाकेंद्रावरील बैठक व्यवस्था **Lift** सुविधा नसल्यास तळमजल्यावर करावी.

- दररोज परीक्षा संपल्यानंतर उत्तरपत्रिका पाकिट सील करतांना हजेरीपत्रकाप्रमाणे विदयार्थी संख्येनुसार उत्तरपत्रिका संख्येची ताळमेळ झाल्याची खात्री करुनच उत्तरपत्रिका पाकिट सील करण्यात यावे. तसेच परीक्षेच्या काळात परीक्षा हॉल/केंद्र येथे चुकून उत्तरपत्रिका गहाळ न झाल्याची खात्री करुन घ्यावी.
- परीक्षेकरीता आवश्यक स्टेशनरीच्या उपलब्धतेबाबत खात्री करुन उत्तरपत्रिका पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्यास परीक्षा सुरु होण्याच्या अगोदर या कार्यालयातून सुचित केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे घेवून जाण्याची व्यवस्था करावी.
- परीक्षा केंद्राच्या सर्व संस्था प्रमुखांनी संकलन केंद्राकडून परीक्षा नियंत्रक यांना परीक्षा केंद्रावर घेवून जाण्यासाठी व परीक्षा संपल्यावर उत्तरपत्रिकाचे सिलबंद गठ्ठे संकलन केंद्रात आणून देण्याकरीता, संकलनकेंद्र प्रमुखांनी व परीक्षा नियंत्रकांनी सूचित केलेल्या वेळेप्रमाणे उत्तम स्थितीतील चार चाकी वाहन चालकासह संकलन केंद्रामध्ये पाठवावे. वाहनासोबत संस्थेचा एक प्रतिनिधी उपस्थित असणे आवश्यक आहे. यासाठी संकलन केंद्राशी त्वरीत संपर्क साधावा. सदर वाहनातून परीक्षा नियंत्रक ये जा करतील. आपल्या परीक्षा केंद्रासाठी **0711 - Jayawant shikshan prasarak mandal's jaywantrao sawant polytechnic , hadapsar** संकलन केंद्र म्हणून असे घोषित करण्यात आलेले आहे.
- **परिक्षार्थींनी उत्तरपत्रिकेवर लिहीलेले आसन क्रमांक बिनचूक लिहीलेले आहेत किंवा नाही याबाबत पर्यवेक्षकांनी खात्री करुन घेण्याबाबतच्या सूचना संबंधित पर्यवेक्षकांना देण्यात याव्या. परीक्षेसाठी नेमलेला अधिकारी वर्ग/कर्मचारी वर्ग यांची आपल्या स्तरावर बैठक घेवून त्यांना त्यांची कर्तव्य व जबाबदारी विषयीची माहिती दयावी व योग्य ती दक्षता घेण्यास सांगावे.**
- परीक्षा केंद्रावर मुख्य परीक्षा अधिकारी, परीक्षा अधिकारी व परीक्षा नियंत्रक व्यतिरिक्त कोणालाही मोबाईल जवळ बाळगण्यास परवानगी नाही आणि आढळल्यास होणा–या कार्यवाहीस संबंधित पात्र असेल याची जाणीव करुन देवून नोंद घेतल्याची स्वाक्षरी घ्यावी. तसेच या सुचनेचे पालन काटेकोरपणे होण्याकरीता आपण स्वतः जातीने लक्ष दयावे. याचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल याची देखील जाणीव करुन दयावी.
- आपल्या परीक्षा केंद्राशी खालील संस्था संलग्न आहेत.

| **Connected Institute Code & Name** |
|---|
| 0145 -Poona district education association's institute. Of technology , hadapsar |
| 0711 - Jayawant shikshan prasarak mandal's jaywantrao sawant polytechnic , hadapsar |
| 0750 - Jayawant shikshan prasark mandal's jaywantrao sawant institute of pharmacy , hadapsar |
| 1088 - J.S.P.M.S. Jaywantrao sawant polytechnic(iind shift) , hadapsar |
| 1948 - Pune district education association's college of pharmacy ,hadapsar , pune |
| 2061 - Shree chhatrapati shivaji shikshan & sanshodhan sanstha's adarsh paramedical institute , pune |
| 22460 - Om shikshan sanstha's angel college of pharmacy , hadapsar |
| 23447 -Vision health care education foundation's vision paramedical institute , pune |

या संस्थेची लेखी परीक्षा आपल्या परीक्षा केंद्रात मंडळाच्या नियमाप्रमाणे घेण्यात यावी.

- विदयार्थ्यांची कॉपीकेस सादर करताना परीक्षेच्या Examination Regulations नुसार कॉपीकेस संबंधित सर्व कागदपत्रे तपासून सदरची संबंधित सर्व कागदपत्रे जोडण्याची जबाबदारी ही सर्वस्वी परीक्षाकेंद्र अधिकारी यांची असेल याची नोंद घ्यावी.
- **परीक्षा कालावधीत मंडळाची वेबसाईट www.msbte.ac.inचे रोज अवलोकन करावे व वेळापत्रकात बदल असल्यास किंवा इतर काही सूचना असल्यास त्याप्रमाणे कार्यवाही करावी.**
- **परीक्षा केंद्रात मोठया स्क्रिनवर सर्व परीक्षा खोल्या व परिक्षार्थी सी.सी.टिव्हीच्या माध्यमातून सुस्पष्ट आणि व्यवस्थित दिसण्याची व्यवस्था असावी. तसेच सी.सी.टिव्ही फुटेज परीक्षेचा निकाल लागेपर्यंत जतन करुन ठेवण्याची व्यवस्था असणे बंधनकारक आहे.**
- भरारी पथकाच्या कामात अडथळा निर्माण केल्यास आपल्यावर मंडळाच्या नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल. तसेच भरारी पथकास, परीक्षा मंडळाच्या नियमानुसार होत नसल्याचे आढळल्यास आपले परीक्षा केंद्र पुढील सर्व परीक्षेकरिता रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
- अंतर्गत भरारी पथकाची नेमणूक करतांना एक महिला शिक्षकाची नेमणूक करणे आवश्यक राहील. तसेच विद्यार्थ्यांनी परीक्षा केंद्रात प्रवेश करतेवेळी विद्यार्थ्यांची तपासणी करणे आवश्यक राहील.

सोबत :–Responsibilities of Examination Centre

(डॉ विजय मा. कोल्हे)
उपसचिव
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ
विभागीय कार्यालय, पुणे–१६